CNRNOMHSN090013972024

**नियमित दिवाणी दावा क्र.२१८/२०२४ मधील नि.क्र.१७ खालील आदेश**
**लक्ष्मण पाटील वगैरे विरुध्द प्रभाकर पाटील व इतर.**

(०१). प्रस्तुतचे अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांना कैफीयत दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

(०२). प्रतिवादींचे कथन असे आहे की, ते प्रस्तुत दाव्यामध्ये वकीलांमार्फत हजर झालेले आहेत. परंतू, कैफियत तयार करण्यासाठी लागणारे जुने ७/१२ उतारे, फेरफार व अन्य कागदपत्रे त्यांना वेळेत उपलब्ध झालेले नाहीत. तसेच नियमीत दिवाणी दावा क्र. २२२/१९९० या दाव्याची नक्कल व सांगली येथील अपील क्र. २०७/२०१९ या अपीलाची कागदपत्रे मिळण्यास बराच कालावधी लागला म्हणून प्रतिवादींना कैफियत देण्यास ऊशीर झाला. त्यामुळे न्यायालयाने प्रतिवादींविरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत केला आहे. प्रतिवादीने मुद्दाम कैफीयत देण्यास उशीर केलेला नाही. यास्तव त्यांनी त्यांच्या विरुध्द झालेला कैफीयत नाही हा आदेश रद्द करण्याची विनंती केली आहे.

(०३). वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन, असे कथन केले आहे की, प्रतिवादींचा अर्जातील कथने काल्पनीक असुन ते वादीला मान्य व कबूल नाहीत. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

(०४). अभिलेख पाहिले. उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेली

परस्पर विरोधी कथने विचारात घेवून अभिलेखाचे अवलोकनार्थ असे दिसते की, प्रस्तुतचा दावा वादीने वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरूप पाहता सदर दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर पारीत होण्यासाठी प्रतिवादीची बाजू ऐकुन घेणे नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे योग्य ठरणार आहे. प्रतिवादींना कैफीयत दाखल करण्यास जो उशीर केलेला आहे त्यामुळे त्यांचेविरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत झालेला आहे. तसेच दाव्याचे कामकाजही लांबणीवर पडले आहे. परंतु त्याकरीता प्रतिवादीने केलेल्या विलंबाबाबत योग्य तो खर्चाचा आदेश पारीत करुन प्रतिवादींचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. असे केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही, उलट दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर होण्यास मदतच होणार आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**01.** प्रस्तुतचा निशाणी क्र. १७ चा अर्ज रक्कम रुपये ५००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

**02.** प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम आज अगर पूढील तारखेपर्यंत वादीला दयावयाची आहे. त्यानंतरच प्रतिवादी क्र. १ व २ यांचेविरुध्द झालेला विना कैफीयत आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.07 17:42:52 +0530

**तासगांव**
दिनांक:०७.०३.२०२६.

(एस.वाय.वाकचौरे)
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
**तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – ०७.०३. २०२६.

न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक – ०७.०३. २०२६.

आदेश अपलोड दिनांक– ०७.०३. २०२६.